शिक्षण मंडळ कराड, संचालित

# महिला महाविद्यालय कराड

## अर्थशास्त्र विभाग

## बहुपर्यायी प्रश्न

विषय - स्थूल/समग्रलक्षी अर्थशास्त्र पेपर II

बी.कॉम भाग - II सेम - IV

### मॉड्युल - I

### व्यापार चक्रे

**1)** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन, रोजगार, व्यापार, किंमत पातळी, मागणी व पुरवठा आणि बचत व गुंतवणूक इत्यादी आर्थिक घटकांमध्ये जे आर्थिक चढ-उतार निर्माण होतात त्यास........ असे म्हणतात.

अ) व्यापार चक्रे ब) गुंतवणूक चक्रे क) तेजीचे चक्र ड) मंदीचे चक्र

**2)** पुढीलपैकी कोणत्या अर्थव्यवस्थेमध्ये सातत्याने व्यापार चक्रे निर्माण होतात ?

अ) मिश्र ब) भांडवलशाही क) साम्यवादी ड) समाजवादी

**3)** व्यापार चक्राच्या पुढील प्रमुख किती अवस्था आहेत ?

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

**4)** व्यापार चक्रातील अवस्थांचा पुढीलप्रमाणे क्रम दिसून येतो ?

अ) तेजी, मंदी, घसरण, पुनरुज्जीवन ब) तेजी, घसरण, मंदी

पुनरुज्जीवन क) मंदी, पुनरुज्जीवन, तेजी, घसरण ड) मंदी, घसरण, पुनरुज्जीवन, तेजी

**5)** अर्थव्यवस्थेत तेजीची अवस्था असताना वस्तूंच्या किमतीत.......होते आणि पैशाच्या मूल्यांमध्ये........ होते.

अ) वाढ, घट ब) वाढ, वाढ क) घट, वाढ ड) घट, घट

**6)** मंदीच्या अवस्थेमध्ये पैशाच्या मूल्यांमध्ये........होते आणि वस्तूंच्या किंमती...... मध्ये होते

अ) वाढ, घट ब) वाढ, वाढ क) घट, वाढ ड) घट, घट

**7)** जेव्हा अर्थव्यवस्थेत उत्पादन, रोजगार, बचत, गुंतवणूक, किंमत पातळी आणि मागणी व पुरवठा यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते तेव्हा अशा स्थितीला..........असे म्हणतात.

अ) तेजी ब) मंदी क) घसरण ड) पुनरुर्जीवन

8) जेव्हा अर्थव्यवस्थेत उत्पादन, रोजगार, बचत, गुंतवणूक, किंमत पातळी आणि मागणी व पुरवठा यामध्ये मोठ्या प्रमाणात घट होते तेव्हा अशा स्थितीला..........असे म्हणतात.

अ) तेजी ब) मंदी क) घसरण ड) पुनरुर्जीवन

9) व्यापार चक्राची पुढील प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात.

अ) व्यापार चक्रे लहरी सारखे असतात ब) व्यापार चक्रे पुनरुद्धभवी असतात क) व्यापार चक्रे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत निर्माण होतात ड) वरील सर्व

10) ज्या व्यापार चक्राचा कालावधी 30 ते 40 महिन्याचा असतो अशा व्यापार चक्राला........... असे म्हणतात.

अ) जगलर व्यापारचक्र ब) किटचन व्यापारचक्र क) कोंड्रटीव्ह व्यापारचक्र ड) कुझनेटस व्यापारचक्र

11) दीर्घकालीन व्यापार चक्राचा कालावधी किती वर्षाचा असतो?

अ) एक ते दोन वर्षे ब) दोन ते तीन वर्षे क) तीन ते सहा वर्षे ड) चार ते आठ वर्षे

12) प्रा हॉट्रे यांच्यामते व्यापार चक्राची निर्मिती..........वाढ झाल्यामुळे होते.

अ) पैशाच्या पुरवठ्यात ब) वस्तूच्या मागणीत क) पैशाच्या मागणीत ड) गुंतवणुकीत

13) प्रा हॉट्रे यांच्यामते बाजारातील...........चे प्रमाण वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेतील समतोल बिघडून व्यापार चक्रांची निर्मिती होते.

अ) मागणी ब) पुरवठा क) पत पैसा ड) गुंतवणूक

14) व्यापार चक्राविषयीचा नवप्रवर्तन सिद्धांत कोणी मांडला आहे?

अ) जे एम केन्स ब) प्रा हॉट्रे क) शुंपीटर ड) डॉ मार्शल

15) शुंपीटर यांच्यामते व्यापार चक्राची निर्मिती..........मुळे होते.

अ) पतपैसा ब) नवप्रवर्तन क) गुंतवणूक ड) संशोधन

16) शुंपीटर यांनी आपल्या व्यापार चक्राच्या सिद्धांतामध्ये पुढीलपैकी कोणत्या घटकाला महत्त्व दिले आहे ?

अ) भूमी ब) भांडवल क) श्रम ड) संयोजक

**17)** ..........मुळे अर्थव्यवस्थेतील समतोल बिघडुन व्यापार चक्रांची निर्मिती होते असे शुंपीटर यांना वाटते.

अ) पतपैसा ब) नवप्रवर्तन क) गुंतवणूक ड) संशोधन

**18)** व्यापारचक्र नियंत्रित करण्यासाठी पुढील पैकी कोणत्या धोरणाचा वापर सरकारकडून केला जातो ?

अ) चलनविषयक धोरण ब) राजकोषीय धोरण क) किंमत नियंत्रण ड) वरीलपैकी सर्व

**19)** अर्थव्यवस्था तेजी मध्ये असताना मध्यवर्ती बँक तेजी वर नियंत्रण ठेवण्यासाठी बँक दरामध्ये.........करते.

अ) वाढ ब) घट क) बदल ड) यापैकी नाही

**20)** राजकोषीय धोरणांतर्गत तेजीच्या आणि मंदीच्या काळामध्ये सरकार करांच्या दरांमध्ये क्रमशः......... करते.

अ) वाढ व घट ब) फक्त घट क) घट व वाढ ड) फक्त वाढ

**21)** व्यापार चक्रातील पुढीलपैकी कोणती अवस्था सर्वात वाईट आणि आर्थिक नुकसान करणारी असते ?

अ) तेजी ब) मंदी क) घसरण ड) पुनरुज्जीवन

**22)** अर्थव्यवस्था मंदी मध्ये असताना सरकारकडून पुढील कोणत्या उपाययोजना केल्या जातात ?

अ) करात घट ब) सार्वजनिक खर्चात वाढ क) कर्जरोख्यांची खरेदी ड) वरीलपैकी सर्व

**23)** तेजीनंतर अर्थव्यवस्थेमध्ये पुढीलपैकी कोणती अवस्था सुरू होते ?

अ) मंदी ब) घसरण क) पुनरुज्जीवन ड) तेजी

**24)** तेजी-मंदीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडून पुढीलपैकी कोणत्या धोरणाचा अवलंब केला जातो ?

अ) राजकोषीय ब) मौद्रिक क) करविषयक ड) खर्च विषयक

**25)** मंदीनंतर अर्थव्यवस्थेमध्ये पुढीलपैकी कोणती अवस्था सुरू होते ?

अ) मंदी ब) घसरण क) पुनरुज्जीवन ड) तेजी

**उत्तरे**

**1**-अ, **2**-ब, **3**-ब, **4**-ब, **5**-अ, **6**-अ, **7**-अ, **8**-ब, **9**-ड, **10**-ब, **11**-ड, **12**-अ, **13**-क, **14**-क, **15**-ब, **16**-ड, **17**-ब, **18**-ड, **19**-अ, **20**-अ, **21**-ब, **22**-ड, **23**-ब, **24**-ब, **25**-क

## मॉड्युल - II

## सार्वजनिक आयव्यय

**1)** सार्वजनिक आयव्ययात सरकारच्या/ सार्वजनिक सत्तांच्या....... चा अभ्यास केला जातो.

अ) सार्वजनिक खर्च ब) सार्वजनिक उत्पन्न क) सार्वजनिक उत्पन्न व खर्च ड) उत्पादन व रोजगार

**2)** पुढीलपैकी अर्थशास्त्राच्या कोणत्या शाखेत सरकारच्या सर्व आर्थिक व्यवहार यांचा अभ्यास केला जातो ?

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) सार्वजनिक आयव्यय ड) विकासाचे अर्थशास्त्र

**3)** पुढीलपैकी कोणत्या विषयांमध्ये सरकारच्या सार्वजनिक उत्पन्न आणि खर्च यांचा अभ्यास केला जातो ?

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) सार्वजनिक आयव्यय ड) विकासाचे अर्थशास्त्र

**4)** सार्वजनिक आयव्ययात पुढील पैकी कोणते घटक अभ्यासले जातात ?

अ) सार्वजनिक उत्पन्न व खर्च ब) संघीय वित्त व्यवस्था क) सार्वजनिक कर्ज व वित्तीय प्रशासन ड) वरीलपैकी सर्व

**5)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने महत्तम सामाजिक लाभाचे तत्त्व मांडले आहे ?

अ) डॉ मार्शल ब) डॉ डाल्टन क) प्रा पिगु ड) प्रा एजवर्थ

**6)** महत्तम सामाजिक लाभ तत्वानुसार समाजाला करावा लागणारा सीमांत त्याग आणि समाजाला मिळणारा सीमांत लाभ जेव्हा....... असतो तेव्हा समाजाचे महत्त्व हित साध्य होते.

अ) जास्त ब) समान क) कमी ड) अति कमी

**7)** डॉ डाल्टन यांच्या मते सरकारकडून पुढील........अटी/निकष पूर्ण होत असतील तर समाजाचे महत्तम हित साधले जाते.

अ) समाजाचे संरक्षण ब) उत्पादन सामर्थ्यात वाढ क) उत्पन्न व रोजगार पातळीत स्थैर्य ड) वरीलपैकी सर्व

**8)** पुढीलपैकी कोणते सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख मार्ग/स्रोत आहेत ?

अ) कर ब) दंड व शुल्क क) अनुदाने व देणग्या ड) वरीलपैकी सर्व

**9)** ज्या कराचा भार आणि कराघात एकाच व्यक्तीवर पडतो त्या करास............. असे म्हणतात.

अ) अप्रत्यक्ष कर ब) प्रत्यक्ष कर क) वस्तू व सेवा कर ड) महामंडळ कर

**10)** ज्या कराचा भार आणि कराघात वेगवेगळया व्यक्तीवर पडतो त्या करास............. असे म्हणतात.

अ) अप्रत्यक्ष कर ब) प्रत्यक्ष कर क) वस्तू व सेवा कर ड) महामंडळ कर

**11)** वस्तू व सेवा कर पुढील पैकी कोणत्या प्रकारचा कर आहे **?**

अ) अप्रत्यक्ष कर   ब) प्रत्यक्ष कर    क) मूल्यवर्धित कर   ड)  यापैकी नाही

**12)** भारतात..........पासून वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला.

अ) **1** जुलै **2016**    ब)  **1** जुलै **2017**     क)  **1** जुलै **2018**    ड)  **1** जुलै **2019**

**13)** पुढीलपैकी कोणी सर्वप्रथम वस्तू व सेवा कराची संकल्पना मांडली **?**

अ) डॉ डाल्टन    ब) प्रा पिगु     क) विल्यम वॉन सीमेन्सी    ड) प्रा एजवर्थ

**14)** संपूर्ण देशामध्ये वस्तू व सेवा कराचा दर.......... असतो.

अ) भिन्न    ब) समान     क) जास्त    ड) कमी

**15)** वस्तू व सेवा कराचे पुढीलपैकी कोणते फायदे दिसून येतात **?**

अ) उत्पादकता    ब) सर्वसमावेशकता     क) करचुकवेगिरीला आळा    ड) वरीलपैकी सर्व

**16)** वस्तू व सेवा कराचे पुढीलपैकी कोणते तोटे दिसून येतात **?**

अ) क्लिष्टता   ब) खर्चिक कर   क) भाव वाढ    ड) वरीलपैकी सर्व

**17)** पुढीलपैकी कोणते सरकारच्या उत्पन्नाचे करेत्तर मार्ग/स्रोत आहेत **?**

अ) दंड    ब)  शुल्क    क) अनुदाने व देणग्या  ड) वरीलपैकी सर्व

**18)** सार्वजनिक खर्च वाढीची पुढीलपैकी कोणती प्रमुख कारणे आहेत **?**

अ) वाढती लोकसंख्या    ब) संरक्षण खर्च     क) कल्याणकारी राज्याची संकल्पना    ड) वरीलपैकी सर्व

**19)** सार्वजनिक खर्चात सरकारने वाढ केल्यास देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात व उत्पन्नात........... होते.

अ) वाढ    ब) घट     क) कमी वाढ    ड) कमी घट

**20)** सरकारकडून सार्वजनिक खर्चात वाढ केल्यास त्याचा समाजाच्या काम, बचत व गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर......... परिणाम होतो.

अ) नकारात्मक    ब) अनुकूल     क) प्रतिकूल    ड) धनात्मक

**21)** जी कर्जे देशांतर्गत भांडवल बाजारातून उभारली जातात अशा प्रकारच्या कर्जाला.......... असे म्हणतात.

अ) अंतर्गत कर्जे  ब) बाह्य कर्जे  क) विदेशी कर्जे  ड) आंतरराष्ट्रीय कर्जे

**22)** सरकारकडून विविध मार्गांनी जी कर्जे उभारली जातात त्या कर्जाना........... असे म्हणतात.

अ) अंतर्गत कर्जे  ब) बाह्य कर्जे  क) सार्वजनिक कर्जे  ड) आंतरराष्ट्रीय कर्जे

**23)** सरकारकडून उत्पन्न व खर्चामधील तूट भरून काढण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या वित्तीय धोरणाचा वापर केला जातो.

अ) राजकोषीय धोरण  ब) मौद्रिक धोरण  क) तुटीचा अर्थभरणा  ड) सार्वजनिक कर्ज धोरण

**24)** तुटीचा अर्थभरणा करण्यासाठी सरकारकडून पुढीलपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब केला जातो

अ) मध्यवर्ती बँकेकडून कर्ज उभारणी  ब) व्यापारी बँकांच्या कडून कर्ज उभारणी  क) नवीन चलन निर्मिती  ड) वरीलपैकी सर्व

**25)** तुटीच्या अर्थभरण्याचे पुढीलपैकी कोणते प्रमुख उद्देश आहेत**?**

अ) युद्धकालीन खर्च भागवणे  ब) आर्थिक मंदीचे निर्मूलन  क) आर्थिक विकास  ड) वरीलपैकी सर्व

**उत्तरे**

**1**-क, **2**-क, **3**-क, **4**-ड, **5**-ब, **6**-ब, **7**-ड, **8**-ड, **9**-ब, **10**-अ, **11**-अ, **12**-ब, **13**-क, **14**-ब, **15**-ड, **16**-ड, **17**-ड, **18**-ड, **19**-अ, **20**-ब, **21**-अ, **22**-क, **23**-क, **24**-ड, **25**-ड

## मॉड्युल - III

## आंतरराष्ट्रीय व्यापार

**1)** देशाच्या भौगोलिक सीमेबाहेर होणाऱ्या व्यापारास........ व्यापार म्हणतात.

अ) अंतर्गत व्यापार  ब) आंतरराष्ट्रीय व्यापार  क) राज्य व्यापार  ड) खाजगी व्यापार

**2)** देशाच्या भौगोलिक सीमेच्या आत होणाऱ्या व्यापारास........ व्यापार म्हणतात.

अ) अंतर्गत व्यापार  ब) आंतरराष्ट्रीय व्यापार  क) राज्य व्यापार  ड) खाजगी व्यापार

**3)** अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये पुढीलपैकी कोणते फरक दिसून येतात **?**

अ) चलन भिन्नता व भिन्न बाजारपेठा  ब) वाहतूक व उत्पादन खर्चात फरक  क) भौगोलिक व हवामान स्थितीत फरक  ड) वरीलपैकी सर्व

**4)** आंतरराष्ट्रीय व्यापाराचे पुढीलपैकी कोणते फायदे आहेत **?**

अ) सामाजिक कल्याणात वाढ ब) मक्तेदारीवर नियंत्रण क) नैसर्गिक संकटात मदत ड) वरीलपैकी सर्व

**5)** आंतरराष्ट्रीय व्यापाराचे पुढीलपैकी कोणते तोटे आहेत **?**

अ) देशाचा एकांगी विकास ब) परावलंबित्व व तीव्र स्पर्धा क) देशी उद्योगांचा ऱ्हास ड) वरीलपैकी सर्व

**6)** पुढीलपैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक सिद्धांत मांडला आहे **?**

अ) डॉ डाल्टन ब) प्रा पिगु क) डेव्हिड रिकार्डो ड) प्रा एजवर्थ

**7)** डेव्हिड रिकार्डो यांच्या मते दोन देशांमधील व्यापार हा............. वर अवलंबून असतो.

अ) तुलनात्मक खर्च-लाभ ब) सापेक्ष लाभ क) सापेक्ष खर्च ड) निरपेक्ष लाभ

**8)** डेव्हिड रिकार्डो यांचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत पुढील पैकी कोणत्या प्रारूपावर आधारित आहे **?**

अ) **2x2x1** ब) **2x2x2** क) **2x2x3** ड) **2x2x4**

**9)** डेव्हिड रिकार्डो यांच्या मते...........हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मूलभूत तत्त्व आहे.

अ) उत्पादन खर्चातील तुलनात्मक फरक ब) वाहतूक खर्चातील सापेक्ष फरक क) किमतीतील सापेक्ष फरक ड) उत्पादन खर्चातील निरपेक्ष फरक

**10) ........** मध्ये डेव्हिड रिकार्डो यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत मांडला.

अ) सन **1816** ब) सन **1817** क) सन **1818** ड) सन **1819**

**11)** ज्या दराने एका देशातील वस्तू दुसऱ्या देशातील वस्तूंच्या मोबदल्यात दिल्या जातात त्यास.......... असे म्हणतात.

अ) व्यापारतोल ब) व्यवहारतोल क) व्यापार शर्ती ड) विनिमय दर

**12)** आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभाचे मापन करण्यासाठी पुढीलपैकी कोणती संकल्पना वापरली जाते **?**

अ) व्यापारतोल ब) व्यवहारतोल क) व्यापार शर्ती ड) विनिमय दर

**13)** जेव्हा निर्यात वस्तूंचे मूल्य आयात वस्तूंच्या मूल्यापेक्षा जास्त असते तेव्हा व्यापार शर्ती त्या देशाला.......... असतात.

अ) अनुकूल ब) प्रतिकूल क) धनात्मक ड) ऋणात्मक

**14)** जेव्हा आयात वस्तूंचे मूल्य निर्यात वस्तूंच्या मूल्यापेक्षा जास्त असते तेव्हा व्यापार शर्ती त्या देशाला.......... असतात.

अ) अनुकूल  ब) प्रतिकूल  क) धनात्मक  ड) ऋणात्मक

**15)** व्यापार शर्तीचे पुढीलपैकी कोणते प्रमुख प्रकार आहेत ?

अ) निव्वळ वस्तुगत व्यापार शर्ती  ब) स्थूल वस्तूगत व्यापार शर्ती  क) आयगत व्यापार शेती  ड) वरीलपैकी सर्व

**16)** आयात किंमत निर्देशांक व निर्यात किंमत निर्देशांक यांच्यामधील गुणोत्तरास.........असे म्हणतात.

अ) निव्वळ वस्तुगत व्यापार शर्ती  ब) स्थूल वस्तूगत व्यापार शर्ती  क) आयगत व्यापार शेती  ड) एक घटकीय व्यापार शर्ती

**17)** व्यापार शर्तीवर पुढीलपैकी कोणते घटक परिणाम करतात ?

अ) मागणी व पुरवठयाची लवचिकता ब) मागणीचा प्रकार व उत्पादनाची रचना  क) अवमूल्यन  ड) वरीलपैकी सर्व

**18)** एका विशिष्ट कालखंडामध्ये एखाद्या देशाचे जगातील इतर देशांशी होणाऱ्या सर्व दृश्य व अदृश्य आर्थिक व्यवहारांचे ताळेबंद पत्रक म्हणजे.......... होय.

अ) व्यापारतोल  ब) व्यवहारतोल  क) व्यापार शर्ती  ड) विनिमय दर

**19)** व्यवहारतोलाची पुढील पैकी कोणत्या दोन भागांमध्ये रचना केलेली असते ?

अ) चालू व भांडवली खाते  ब) भांडवली व मुदत खाते  क) चालू व बचत खाते  ड) बचत व मुदत खाते

**20)** जेव्हा एखाद्या देशाच्या निर्यात मूल्यापेक्षा आयात मूल्य जास्त असते तेव्हा त्या देशाचा व्यवहारतोल हा........ असतो.

अ) समतोलित  ब) असमतोलित  क) नकारात्मक  ड) धनात्मक

**21)** व्यवहारतोलामध्ये असमतोल होण्याची पुढीलपैकी कोणती कारणे आहेत ?

अ) चलनवाढ  ब) राष्ट्रीय उत्पन्नातील बदल  क) भांडवलाचे उड्डाण व व्यापार चक्रे  ड) वरीलपैकी सर्व

**22)** व्यवहारतोलामधील असमतोल दुरूस्त करण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या उपाययोजना करण्यात येतात ?

अ) आयात घट व निर्यातीत वाढ  ब) चलन घट  क) अवमूल्यन ड) वरीलपैकी सर्व

**23)** जेव्हा सरकारकडून व्यापारावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादले जात नाहीत तेव्हा अशा प्रकारच्या व्यापाराला......... असे म्हणतात.

अ) आंतरराष्ट्रीय व्यापार  ब) मुक्त व्यापार  क) अंतर्गत व्यापार  ड) संरक्षित व्यापार

**24)** मुक्त व्यापाराच्या समर्थनार्थ पुढीलपैकी कोणते मुद्दे मांडले जातात

अ) उत्पादनात वाढ ब) मक्तेदारीवर नियंत्रण क) बाजारपेठांचा विस्तार ड) वरीलपैकी सर्व

**25)** जेव्हा सरकारकडून व्यापारावर विविध प्रकारचे निर्बंध लादले जातात तेव्हा अशा प्रकारच्या व्यापाराला......... असे म्हणतात.

अ) आंतरराष्ट्रीय व्यापार ब) मुक्त व्यापार क) संरक्षित व्यापार ड) अंतर्गत व्यापार

**उत्तरे**

**1-ब, 2-अ, 3-ड, 4-ड, 5-ड, 6-क, 7-अ, 8-अ, 9-अ, 10-ब, 11-क, 12-क, 13-अ, 14-ब, 15-ड, 16-अ, 17-ड, 18-ब, 19-अ, 20-ब 21-ड, 22-ड, 23-ब, 24-ड, 25-क**

प्रा. अनिल सुतार
अर्थशास्त्र विभाग
(महिला महाविद्यालय कराड)